# राज्य माहिती आयोग, मुख्यालय, मुंबई
## माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ मधील कलम १९(३)
## अन्वये दाखल झालेले अपील

माहितीचा अधिकार

**क्र.मुमाआ/नों.क्र.७९५१/२१/अ.क्र.१२९३/२५/०१**

**श्री. जाहिद अली शेख**
गफुर कंपाऊन्ड फ्लॉट नं,२ .
धारावी लिंक रोड४०००१७-धारावी मुंबई ,

**विरुद्ध**

**जन माहिती अधिकारी तथा वसाहत अधिकारी जी/उत्तर विभाग**
बृहन्मुंबई महानगरपालिका, जी/उत्तर विभाग यांचे कार्यालय,
तळमजला, हरिश्चंद्र येवले मार्ग, दादर (प), मुंबई ४०० ०२८.

**प्रथम अपीलीय अधिकारी तथा सहाय्यक आयुक्त जी/उत्तर विभाग**
बृहन्मुंबई महानगरपालिका, जी/उत्तर विभाग यांचे कार्यालय,
तळमजला, हरिश्चंद्र येवले मार्ग, दादर (प), मुंबई ४०० ०२८.

**द्वितीय अपील अर्ज सुनावणी दिनांक : १८.०६.२०२५**

| | | |
|---|---|---|
| अपीलकर्ता | : | अनुपस्थित. |
| विद्यमान जन माहिती अधिकारी | : | अनुपस्थित |
| प्रथम अपीलीय अधिकारी | : | अनुपस्थित |

| मूळ अर्जाचा दिनांक | जन माहिती अधिकाऱ्याच्या उत्तराचा दिनांक | प्रथम अपीलाचा दिनांक | प्रथम अपीलीय प्राधिकाऱ्याच्या निर्णयाचा/आदेशाचा दिनांक |
|---|---|---|---|
| ०३.०३.२०२१ | ०३.०४.२०२१ | ०९.०४.२०२१ | - |

अपीलार्थी यांनी माहितीच्या अधिकार अधिनियम, २००५ च्या कलम ६(१) नुसार जन माहिती अधिकारी यांच्याकडे दि.०३.०३.२०२१ रोजी माहितीचा अर्ज सादर केला असून त्यात त्यांनी "दि.१७.०२.२०२१ रोजी ६० फुट अनधिकृत बांधकाम अभिनंदन बार याची तक्रार केली होती सदर तक्रारीवरील कारवाई संबंधित" अनुषंगाने खालीलप्रमाणे मुद्येनिहाय माहितीची मागणी केलेली आहे.

सदर माहिती अर्जावर जन माहिती अधिकारी यांनी दि.०३.०४.२०२१ रोजी "जोडपत्र अ मध्ये मागणी केलेली माहिती कार्यालयाच्या अभिलेखावर उपलब्ध नाही. सबब माहिती देता येणे शक्य नाही", असे उत्तरान्वये कळविले आहे.

अपीलार्थी यांनी दि.०९.०४.२०२१ रोजी कलम १९(१) नुसार प्रथम अपीलीय अधिकारी यांचेकडे "जोडपत्र अ मध्ये मागणी केलेली माहिती मिळावी", असे कारण नमूद करुन प्रथम अपील अर्ज दाखल केला आहे.

प्रथम अपिलीय अधिकाऱ्यांचे आदेश नस्तीमध्ये उपलब्ध नाही.

अपीलार्थी यांनी माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ मधील कलम १९ (३) नुसार आयोगाकडे दि.जुलै, २०२१ रोजी "माहिती अर्जात मागणी केलेली माहिती प्राप्त झाली नाही", असे कारण नमूद करुन द्वितीय अपील दाखल केले आहे.

सदर द्वितीय अपीलावर आज दि.१८.०६.२०२५ रोजी सुनावणी आयोजित करण्यात आली असून सुनावणी दरम्यान अपीलार्थी, जन माहिती अधिकारी तथा वसाहत अधिकारी जी/उत्तर विभाग व प्रथम अपीलीय अधिकारी तथा कार्यकारी अभियंता जी/उत्तर विभाग यांना सुनावणी नोटीस प्राप्त झाली असून कोणतीही पूर्व सूचना न देता अनुपस्थित आहेत.

या अपिलासंदर्भातील कागदपत्रांचे अवलोकन केल्यावर आयोग या निष्कर्षावर येत आहे की, प्रस्तुत प्रकरणात अपिलार्थी यांनी दाखल केलेल्या जोडपत्र अ व ब हा कोविड कालावधीत संपूर्ण देशात कोविड-१९ ची लाट चालू असताना आणि वैद्यकीय आणीबाणी चालू असताना आला, या बाबतीत मा. सर्वोच्च न्यायालयाने दिलेले दिशानिर्देश तसेच मा. मुंबई उच्च न्यायालयाच्या पुर्ण पिठाने कोरोना कालावधीत झालेल्या विलंब क्षमा करण्याबाबत जारी केलेले दिशानिर्देश इत्यादी अवलोकन केले असता, तसेच आज झालेल्या सुनावणीस अपिलार्थी सुनावणी नोटीस प्राप्त झाली असून कोणतीही पूर्व सूचना न देता अनुपस्थित आहे. अपिलार्थीना नेमकी कोणती माहिती मिळावी, याबाबतीत कोणताच अर्थबोध होत नाही. तथापि, विद्यमान जन माहिती अधिकारी तथा वसाहत अधिकारी जीउत्तर विभाग/ यांनी दि.१७.०२.२०२१ रोजीच्या तक्रार अर्जावर कोणती कार्यवाही अथवा कारवाई केली याबाबतची माहिती विद्यमान जन माहिती अधिकारी तथा वसाहत अधिकारी जी/उत्तर विभाग यांच्या कार्यालयाच्या अभिलेखावर कलम २(च) प्रमाणे उपलब्ध असेल तर, सदर माहिती अपिलार्थींना विनामूल्य प्रदान करण्याचे निर्देश देऊन प्रस्तुत अपिल अर्ज निकाली काढून नस्ती बंद करण्यात येत आहे

**आदेश**

**१.वरील विवेचनानुसार जन माहिती अधिकारी यांनी कार्यवाही करावी.**
**२.वरील अपिल निकाली काढण्यात येत आहे.**

**ठिकाण : मुंबई**
**दिनांक : १८.०६.२०२५**

**( राहुल पांडे )**
**राज्य मुख्य माहिती आयुक्त**

State Information Commission ★ Maharashtra ★